पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८.
क्र. लेखा/१४/कावि/१२/२०१४
दिनांक - ०३/०२/२०१४

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना म.न.पा.कडून घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज मंजूर केले जाते. सद्य स्थितीत लेखा विभागामार्फत सदर अग्रिमांचा नाहरकत दाखला (NOC) देण्यात येत होता. तथापि यापुढे सदरची NOC कर्मचारी पगारबिलाच्या संगणक प्रणालीवर तसेच कर्मचारी PERSONNEL PAGE वर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ज्या कर्मचा-यांचे मुद्दल व व्याजाची पूर्ण वसुली झालेली आहे. फक्त अशाच कर्मचा-यांच्या अग्रिम रक्कमेबाबतची NOC सदर ठिकाणी उपलब्ध आहे. चालू महिन्यात मुद्दल व व्याज संपलेल्या कर्मचा-यांची NOC त्याच महिन्याचे १० तारखेनंतर सदर संगणक प्रणालीद्वारे उपलब्ध होणार आहे.

तरी सदर परिपत्रकाद्वारे कळविणेत येते की, यापुढे लेखा विभागाकडे नाहरकत दाखला ( NOC) मिळण्यासाठी पत्रव्यवहार करू नये.व संबंधितांनी सदर NOC पगारबिलाच्या संगणक प्रणालीवरून किंवा कर्मचारी PERSONNEL PAGE वरून DOWNLOAD करून घ्यावी.

मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रत -
सर्व विभाग